# अहमदनगर जिल्हा

## लिपीक-टंकलेखक व तलाठी संवर्गातील रिक्त पदभरतीकामी दिनांक १९/०८/२००९ रोजी होणा-या लेखी परिक्षेबाबत निवेदन

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे आस्थापनेवरील लिपीक - टंकलेखक व तलाठी संवर्गातील रिक्त पदभरतीकामी दैनिक सार्वमत व पुढारीचे दिनांक २१/०७/२००९ रोजीचे अंकात जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. सदर पदांकरिता दिनांक १९/०८/२००९ रोजी लेखी परिक्षा आयोजित करणेत आली होती. लिपीक टंकलेखक पदाकरीता सुमारे ६१११ व तलाठी पदासाठी सुमारे ३४००० अर्ज प्राप्त झाले आहेत. परंतु सध्या संपूर्ण देशभर स्वाईन फ्ल्यु हा आजार वेगाने पसरत असून सदरचा आजार संसर्गजन्य स्वरूपाचा आहे. नगर जिल्हयाच्या लगत पुणे जिल्हयात सदर आजार हा वेगाने पसरत आहे. अशावेळी लिपीक-टंकलेखक परिक्षेसाठी ६१११ व तलाठी परिक्षेसाठी ३४००० उमेदवार एकाचवेळी नगर जिल्हयात / मुख्यालयात आल्यास सदर आजार जिल्हयात पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच त्याचा प्रसार होण्याची दाट शक्यता आहे. या बाबी लक्षात घेता स्वाईन फ्ल्युमुळे निर्माण होणारी परिस्थिती टाळणेसाठी जिल्हा प्रशासनाने दिनांक १९/०८/२००९ रोजी होणारी लेखी परिक्षा तूर्त स्थगित करणेचा निर्णय घेतला आहे. परिक्षेची पुढील तारीख यथावकाश वृत्तपत्रांतून व जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे संकेतस्थळावर (वेबसाईटवर) जाहिर करणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/---**
**जिल्हाधिकारी अहमदनगर**